Estd: 1962

NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परीक्षा विभाग

## सुधारित परिपत्रक

**संदर्भ : या कार्यालयातील परीपत्रक क्र शिवाजी वि/ परीक्षा विभाग/ १८३ दि. १५/१०/२०२०**

कोव्हीड १९ आणि त्या अनुंषगाने उदभवलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर मार्च/एप्रिल/ मे, २०२० च्या उन्हाळी सत्रातील अंतिम वर्षाच्या अंतिम परीक्षा सत्राच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या असून सदरच्या परीक्षा या ऑनलाईन आणि ऑफलाईन (विद्यार्थ्याने निवडलेल्या पर्यायानुसार) पध्दतीने होत असून विद्यार्थ्यानी खालील सूचना अवलोकनी घ्याव्यात.

१) परीक्षार्थीनी परीक्षेपूर्वी प्रवेशपत्रावरील (हॉल तिकीट) स्वत:चा बैठक क्रमांक, परीक्षेचे वेळापत्रक व विषय यांची पडताळणी करुन घ्यावी. तसेच वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येणाऱ्या सूचना अवलोकनी घ्याव्यात.

२) परीक्षार्थिनी विद्यापीठ संकेतस्थळावर तसेच अधिविभाग / महाविद्यालय यामध्ये उपलब्ध असणाऱ्या यादीमध्ये नावासामोर ऑनलाईन/ ऑफलाईन पर्याय याची पडताळनी करावी.

**३) ऑनलाईन परीक्षा देताना फोन /लॅपटॉप/डेस्कटॉप यांना कॅमेरा आसणे बंधनकारक नसून परीक्षार्थीने परीक्षा सुरु केल्यानंतर " allow access to web camera" अशी सुचना आल्यानंतर ज्यांना कॅमेरा सुरु ठेवावयाचा असेल त्यांनी "Yes" पर्याय निवडावा व वेब कॅमेरा वापरणार नसणाऱ्या विद्यार्थ्यांनी "No" असा पर्याय निवडून पुढे जावे.**

४) ऑनलाईन / ऑफलाईन परीक्षा देताना कोणत्याही प्रकारचे पुस्तक, नोटस, वही, भ्रमणध्वनी, डिजिटल डायरी अथवा तत्सम साधने यांचा वापर करण्यास प्रतिबंध आहे याची नोंद घ्यावी. तथापि ज्या अभ्यासक्रमांना सांयटिफीक कॅलक्युलेटर वापरणे आवश्यक आहे. अशा अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थीना सांयटिफीक कॅलक्युलेटर वापरणेस परवानगी आहे.

५) ऑनलाईन परीक्षार्थीनी परीक्षेसाठी उत्तम प्रतीचे इंटरनेट कनेक्शन असल्याची खात्री करून घ्यावी तसेच ऑनलाईन परीक्षा देण्याचे Portal सोडून अन्य सर्व पोर्टल बंद करावीत आणि Instant Messaging Tools (Skype, AIM, MSN Messenger) आणि ई-मेल प्रोग्रॅम बंद करावेत.

६) परीक्षा कालावधीत इतर अनावश्यक ॲप्स अनइन्स्टॉल करावीत. तसेच आपल्या मोबाईलमधील Google Chrome Software चे Latest Update करुन घ्यावे.

७) लॅपटॉप/ डेस्कटॉप/ मोबाईल पूर्ण चार्ज असल्याची खात्री करावी.

८) ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

९) परीक्षेवेळी परीक्षार्थीच्या आसपास अन्य कोणीत्याही व्यक्तीस उपस्थित रहाता येणार नाही.

१०) परीक्षार्थीनी परीक्षेपुर्वी लॉगीन करावे व लॉगीन केल्यानंतर सबंधित विद्यार्थ्यांने त्यामधील माहीती याची पडताळणी करुन घ्यावी.

११) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी डेस्कटॉप, लॅपटॉप (Windows/Linux/Mac.) तसेच स्मार्ट मोबाईल फोनचे वेब ब्राऊझर अद्ययावत असल्याची खात्री करावी.

१२) ऑनलाईन परीक्षा देत असताना परीक्षार्थींनी मोबाईलवर कोणतेही बाहेरुन येणारे फोन/कॉल स्विकारु नयेत.

१३) ॲन्टीव्हायरस विंडो, नोटीफिकेशन, अलर्टस यांचे अपडेटस अनेबल करावेत.

१४) परीक्षा जर Connectivity, विद्युत पुरवठा अन्य कोणत्याही कारणास्तव खंडीत झाल्यास परीक्षार्थीने पूर्वीचे लॉगीन आयडी व पासवर्डचे क्रिडेंशियल वापरुन परत लॉगीन होता येईल. यासाठी ३० मिनीटांचा अधीकचा कालावधी देण्यात आला आहे.

१५) परीक्षे दरम्यान कोणात्याही कारणास्तव ब्रेक घेता येणार नाही.

१६) विद्यापीठ संकेतस्थळाबर परीक्षेबाबत मार्गदर्शन करणारा व्हिडिओ उपलब्ध असून तो परीक्षार्थींनी पहावा.

१७) ऑफलाईन पदधतीने होणाऱ्या परीक्षेसाठी विद्यापीठाचे परीपत्रक क्र. ३३७ दि.१६/१०/२०२० अवलोकनी घ्यावे.

**१८) पदविका / पदव्युतर पदविका/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम व इतर काही अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या परीक्षा संबधित अधिविभाग/ महाविद्यालयामार्फत दि.२७/१०/२०२० ते दि. ५/११/२०२० या कालावधीत होणार आहेत. सदर अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षा विद्यापीठ संगणकप्रणालीतून होणार नाही. तरी या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संबधित अधिविभाग/ महाविद्यालय यांच्या संपर्कात रहावे.**

१९) प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाबाबत तक्रार/ त्रुटी असल्यास विद्यार्थ्यांनी उपकुलसचिव, परीक्षक नियुक्ती, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर, ४१६ ००४ यांचेकडे परीक्षा झाल्यापासून सात दिवसाच्या आत विभागप्रमुख/ प्राचार्य यांचेमार्फत योग्य त्या कागदपत्रासहीत सादर करावी.

२०) परीक्षेसंदर्भात काही तक्रारी असतील तर त्यांनी helpline@unishivaji.ac.in या email वर नोंदी करु शकता.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र: शिवाजी वि/परीक्षा विभाग/१९२**
**दिनांक : २३/१०/२०२०**

प्रति,

१) मा. अधिविभागप्रमूख/संचालक/ सर्व पदवी आणि पदव्युत्तर अधिविभाग

२) मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था

३) मा.संचालक, दूर शिक्षण केंद्र.

४) मा. उपकुलसचिव/सहा. कुलसचिव/समन्वयक-सर्व प्रशासकीय विभाग.

५) समन्वयक, इंटरनेट कक्ष - संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.